Localdisc (E) niyatran/ order

# कार्यालय, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.भुम

दुरध्वनी क्रमांक ०२४७८ २७२०१३ ईमेल आयडी - arbhoom@gmail.com

512 जाक्र.नियंत्रण /प्रशासक म/ नेणुक/ सन २०१८ दिनांक ::- 16 /०१/२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (१) अन्वये आदेश**

वाचा :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (१)

ज्याअर्थी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.डोकेवाडी ता.भुम या संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक ०२.०४.२०१५ रोजी संपलेली असल्यामुळे नविन संचालक मंडळ अस्तित्वात येणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ५(२) नुसार संस्थेने मुदत संपण्यापूर्वी १२०/१५० दिवस अगोदर संस्थेच्या सभासद मतदारांची प्रारुप मतदार यादी व निवडणुक निधी मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण ,महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक होते. परंतू संस्थेच्या संचालक मंडळाने सदर नियमाचे पालन केलेले नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ नुसार विहीत मुदतीत विवरणपत्रे सादर करणे बंधनकारक असताना संस्थेने सदर विवरणपत्रे सादर केलेली नाहीत.

ज्याअर्थी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ,उस्मानाबाद यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.११९, दिनांक ०८.०१.२०१८ अन्वये संस्थेवर प्रशासक नेमणेबाबत श्री.रामदास कोळगे ,माजी जि.प.सदस्य ,उस्मानाबाद यांनी मा.ना.सुभाष (बापु) देशमुख मंत्री. सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,महाराष्ट्र राज्य पुणे यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राचे अनुषंगाने मा.मंत्री महोदय यांनी याबाबत आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे. तसेच संस्थेचे सचिव यांनी दि.१६.०१.२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार प्रस्तावित प्रशासकीय मंडळातील व्यक्ती श्री.गौतम मोतिराम थोरात २. साहेबराव तायप्पा जाधव व बाळु विठ्ठल चव्हाण हे संस्थेचे सभासद असुन ते यापूर्वी संचालक मंडळावर कार्यरत नव्हते किंवा त्यांना संचालक म्हणुन अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

त्याअर्थी मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

मी एस.ए.गोगले ,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (१) अ मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.डोकेवाडी ता.भुम या संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन संस्थेचे प्रशासकीय मंडळ पदी १) श्री.गौतम मोतिराम थोरात -अध्यक्ष २. साहेबराव तायप्पा जाधव व ३. बाळू विठ्ठल चव्हाण यांची नियुक्ती करीत आहे.

सहकारी संस्था भुम जि. उस्मानाबाद सत्यमेव जयते

(एस.ए.गोगले) 16/1

**सहाय्यक निबंधक**

**सहकारी संस्था ता.भुम**

प्रत,

१) चेअरमन ,विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.डोकेवाडी यांना देवुन कळविण्यात येते कि, संस्थेचा पद्भार प्रशासकीय मंडळाकडे तात्काळ सुपुर्त करावा.

२) सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.डोकेवाडी ता.भूम यांना पूढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.

३) (१) श्री.गौतम मोतिराम थोरात (२)साहेबराव तायप्पा जाधव व बाळू विठ्ठल जाधव यांना देवुन कळविण्यात येते कि, संबंधीत संस्थेचा प्रशासकीय पद्भार घेवुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४) शाखाधिकारी ,उबाद जिल्हा मध्य.सह बँक लि. शाखा गिरवली

५) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ,उस्मानाबाद यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहाय्यक निबंधक**

**सहकारी संस्था ता.भुम**